Impact Factor 3.025

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly Publish Journal

VOL-IV ISSUE-III MAR. 2017

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512 (MS.)
- (+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
- aiirjpramod@gmail.com
- aayushijournal@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# हुंडाबळी एक स्त्री शोषणाची कुप्रथा

**डॉ. रामेश्वर माधवराव खंदारे**
लोकप्रशासन विभाग प्रमुख,
दयानंद कला महाविद्यालय, लातूर.

**प्रस्तावना :**

भारताला स्वातंत्र्य मिळून ६७ वर्षे पूर्ण झाली तरीही महिलांवरील अत्याचार कमी झाला नाही. महिला समाजामध्ये पुरुषाप्रमाणे अधिकारांचा वापर करू शकत नाहीत. भारत इंग्रजाच्या गुलामगिरीतून मुक्त झाला पण आजुनही आपल्या देशातील महिला मात्र पुरुषप्रधान संस्कृतीच्या बळी पडतात. आपल्या समाजातील प्रत्येक क्षेत्रात महिलांना हिन दर्जाची वागणूक दिली जाते.

**"लेक जन्माला आली, घोर बापाले लागला.**
**चार पोरींचा उताडा, बांधू कोणाच्या गाठीला"**

या दोन ओळी प्रमाणे त्या पोरीच्या बापाची आवस्था होते. तो कष्ट करुन आपल्या मुलाबाळाला पोसतो पण समाजाची वाईट नजर त्या मुलीवर असते. समाज त्या मुलीवर अनेक संशयी नजरेने पाहत असतो. मुली शाळा, महाविद्यालयात चालल्या की त्यांन छेडण्याचे प्रकार दिसून येतात.

आज आपला देश इतका प्रगत होऊन ही महिलांवरिल लैंगिक शोषणाचे प्रमाण कमी झाले नाही. तीचे लैंगिक शोषण करून तिला समाजामध्ये हिन दर्जाची वागणूक दिली जाते. समाजात तिला वावरण्याची परवानगी मिळत नाही. तिला समाजाकडून तसेच नातेवाईकांकडून वेगवेगळया प्रकारची बोलणी खावी लागतात. तसेच लेकीचे लग्न झाले की, सासरचे लोक तिला व तिच्या घरच्यांना हुंडयासाठी त्रास देतात. समाजात हुंडा, घटस्फोट हे सर्वात मोठे स्त्रियांवर होणारे अत्याचार आहेत. स्त्रिया घरातून कार्यालयापर्यंत जाईपर्यंत तिला स्वतःचा बचाव करावा लागतो.

**"लेकीला जन्म तर तिचे माय-बाप देतात, पण मोठ कस करणार हे विचार शेजाऱ्याला पडतात.**
**लेकीच शिक्षण तर माय-बाप करतात, पण याच दुःख नातेवाईकांना होते.**
**लेकीच लग्न तर माय-बाप करतात, पण लग्नाच कोड समाजाला पडत."**

आधुनिक काळात शिक्षणाचा मोठा प्रसार होऊन ही हुंडाबळीची समस्या कमी झालेली नाही. शिक्षणामुळे स्वअस्तित्वाचा शोध लागल्या महिलांनी मोठया प्रमाणावर सक्षमीकरणाकडे वाटचाल सुरु असली तरीही घराबाहेर पडलेली स्त्री स्वतःच्या घरातच सुरक्षित नाही. सुरक्षमुळे एके काळी आदर्श समजल्या जाणाऱ्या महाराष्ट्राची झालेली घसरण विचार प्रवृत्त करायला लावणारी आहे. गेल्या काही वर्षामध्ये महिलांवर अत्याचार हिंसाचाराच्या घटनामध्ये वाढ झाली आहे. सामाजिक प्रतिष्ठा आणि भितीमुळे अनेक प्रकरणाची नोंद करण्यास महिला पुढे येत नाही.

**संशोधनाची उदिष्टये :**

१. भारतीय समाज व्यवस्थेतील महिला अत्याचाराचा अभ्यास करणे
२. महिला अत्यचार व हुंडा बळी यांचा सहसंबध अभ्यासणे.
३. भारतातील हुंडाबळी समस्यांचा अभ्यास करणे.
४. हुंडा बळीवरील उपाययोजनांचा शोध घेणे.

**संशोधनातील गृहितकत्ये :**

१. भारतात हुंडा कारणामुळे अनेक महिलांच्या अत्याचारात वाढ होत आहे.
२. हुंडा बळीचे प्रमाण अधिक वाढत आहे.
३. हुंडाप्रथा ही मानवी दुषप्रवत्तीमुळे निर्माण झालेली मनोवृत्ती आहे.

४. हुंडाबळीचे प्रमाण हे सुशिक्षीत कुंटुबात अधिक आहे.

**महिला अत्याचार व हुंडा प्रथा :**

लग्न झाल्यावर अगदी पहिल्या दिवसापासून ते पहिल्या काही वर्षापर्यंत नववधूंना घरातील नातेवाईक, नवरा, सासू-सासरे, ननंदा आणि क्वचित कोठे दीर छळायला सुरूवात करतात. मारहाण करणे, अपमानास्पद बोलणे, उपाशी ठेवणे, कोंडून ठेवणे, जाळून मारणे, ठार मारणे असा छळ करण्याचे कारण तिने स्वत: कमवित असेल तर स्वत:चे पैसे द्यावेत किंवा माहेरच्या माणसांकडून आणावेत, माहेरच्या वाटण्यामध्ये हिस्सा मागावा व न दिल्यास त्रास देणे हा उद्देश असतो. अशा पैशांना व अशा रितीने मागण्याला हुंडा मागणे असे म्हटले जाते.

४९८ (अ) कलमानुसार लग्नानंतर सात वर्षाच्या आत जर नववधू मुलीचा मृत्यू झाला तर तो संयशायस्पद मानण्यात येतो. न्यायवैदक प्रयोगशाळेत प्रसिद्ध केलेल्या वार्षिक अहवालातील आकडेवारीनुसार गतवर्षी मराठवाडयातील ३८९ महिला हुंडावळीच्या शिकार ठरल्या आहेत. यावरून वास्तव समोर येते.

२०१०-११ यावर्षी खालीलप्रमाणे मराठवाडयातील काही जिल्हानिहाय हुंडाबळीचे प्रमाण : औरंगाबाद - ९८, बीड - ५६, नांदेड - ५६, लातूर - ५२, परभणी - ४३, जालना - ४१, हिंगोली - ३३ उस्मानाबाद - २५.

भारत सरकारने जाने १९९३ च्या एका अहवालानूसार देशात एका दिवसात ३३ हत्या तर एका वर्षात साधारणता ५००० हत्या होतात असे स्पष्ट केले आहे. युनिसेफच्या (UNICFF) The Progress of Nations १९९७ च्या आंतरराष्ट्रीय अहवालानूसार भारतात दरवर्षी ५ हजारा पेक्षा जास्त महिलांची कौटुंबीक हिंसाचारात आर्थीक म्हणजेच हुंडयासाठी हत्या केली जाते.

विशेष महत्वाची बाब म्हणजे हुंडयामुळे होणाऱ्या हत्या या बहुतांशी पतीच्या घरी एकांतात आणि कुटूंबाच्या सदस्याच्या संगनमताने होत असतात. भारतीय समाजात एक प्राचीन प्रथा म्हणून हुंडा पध्दतीचा उल्लेख अथर्व वेदामध्ये आहे.

१९९० मध्ये देशात महिलांचा हुंडयासाठी एकूण ४१४८ हुंडाबळीच्या घटनांची नोंद करण्यात आली होती. विशेष म्हणजे हुंडाबळी जाणाऱ्या अनेक प्रकरणाची नोंद केली जात नाही. १९९० मध्ये कौटुंबिक हिंसाचारात उत्तरप्रदेशात १५१६, महाराष्ट्रात ८५८, पश्चिम बंगालमध्ये ४२० आणि मध्यप्रदेशात ३९७ इतकी आर्थीक हिंसा हुंडाबळीची संख्या होती. भारतातील उत्तरप्रदेशात या राज्यात हुंडाबळीची संख्या सर्वात जास्त महाराष्ट्रात १९८५ मध्ये हुंडयामुळे १७३ महिलांची हत्या झाली होती तर १९८७ मध्ये ३६८ आणि १९९१ मध्ये ८६२ इतकी हुंडाबळीची संख्या होती.

**भारतातील हुंडाबळींची संख्या**

| जनगणना वर्षे | स्त्रियाचे प्रमाण (दर हजारी) |
|---|---|
| १९८७ | १९१२ |
| १९८९ | ४२१५ |
| १९९० | ४८३६ |
| १९९१ | ५१५७ |
| १९९२ | ४९६२ |
| १९९३ | ५८१७ |
| १९९४ | ४९३५ |

**संदर्भ : भारत सरकारच्या गृहमंत्रायातंर्गत राष्ट्रीय गुन्हे नोंदणी कार्यालयाद्वारे प्रकाशीत.**

**हुंडाबळीची समस्या :**

**वधूला जाळण्याच्या गंभीर समस्येला आळा घालण्याच्या दृष्टीने पुढील उपाययोजना सुचविता येतील :-**

आर्थीक हिंसाची समस्या सोडविण्यासाठी केंद्र सरकारने हुंडा प्रतिबंधक कायदा केला, तसेच राज्य सरकाने हुंड्याची समस्या सोडविण्यासाठी केंद्र सरकारने हुंडा प्रतिबंधक कायदा केला. तसेच राज्य सरकारने सुध्दा कायदे केले आहेत. कायदयामुळे हुंडयाच्या संदर्भात पोलीसात तक्रार केल्यास हुंडा देणाऱ्या आणि घेणाऱ्यास शिक्षा दिली जाते. असे असले तरी हुंडयाची समस्या सुटत नाही. उलट हुंडाबळीच्या संख्येत वाढ झाली आहे. यासाठी उपाययोजना करणे आवश्यक आहे.

लोकांमुळे हुंड्याची समस्या निर्माण झाली आहे. जोपर्यंत हुंड्या विरोधी जनमत निर्माण होत नाही. तोपर्यंत हुंड्याची समस्या नष्ट होणार नाही. कायदे करून सुध्दा हुंड्याची समस्या सुटत नाही कायद्याचे यश हे नेहमीच सर्वसामान्य लोकांच्या सहकार्यावर अवलंबुन असते. म्हणून हुंडयाच्या विरोधात जनमत निर्माण करणे आवश्यक आहे. सभा संम्मेलन चर्चासत्र इत्यादीच्या माध्यमातून हुंड्याविषयी जनमत निर्माण केले पाहीजे.

२००१ च्या जनगणनेनूसार स्त्रियांमध्ये साक्षरतेचे प्रमाण ५४.१६ % तर पुरुषामध्ये ७५.८५ % आहे. यावरून हे स्पष्ट होते की, महिलांमध्ये साक्षरतेचे प्रमाण पुरुषांच्या तुलनेत कमी आहे.त्याकरीता मुलींना शिक्षण देणे आवश्यक आहे. शिक्षणामुळे स्त्रियांमध्ये आत्मविश्वास निर्माण होईल. त्या स्वाभिमानी बनतील आणि आपल्यावर होणाऱ्या अन्याय अत्याचाराविरुध्द आवाज उठवू शकतील. शिक्षणामुळे मुलगी स्वतःच्या भविष्यासबंधीचा निर्णय घेण्यास समर्थ बनतील.

समाजात कौटुंबीक हिंसाचार विरोधी वातावरण निर्माण करण्यासाठी हुंडाविरोधी चळवळ मोठ्या प्रमाणात निर्माण व्हायला पाहीजे. आज देशात हुंडाविरोधी चळवळ आहे. परंतू या चळवळीत अगदी थोडे लोक आहेत. हुंडाविरोधी चळवळीत सर्वसामान्य लोकांचा अभाव आहे. याकरीता टिकलेल्या स्त्रियांनी आणि हुंडाविरोधी असलेल्या पुरुषांनी हुंडाविरोधी चळवळ अधिक व्यापक करण्याची आवश्यकता आहे. हुंडा न घेणाऱ्या तरुणाची आम्ही विवाह करु असा निर्धार देशातील तरुणीनी केलातर हुंडा मागणाऱ्या कुटूंबातील तरुणाचे विवाह होणार नाही. अशा वेळी हुंडा मागणाऱ्या तरुणावर अविवाहीत राहण्याची वेळ येईल त्यामुळे हे तरुण आपल्या आई वडीलांना विरोध करून हुंडा न घेता विवाह करण्यास तयार होतील.

कौटुंबीक हिंसाचार विरोधी वातावारण तयार करण्याच्या दृष्टीने शाळा, महाविद्यालयतील मुला-मुलींना हुंडाविरोधी चळवळीत सहभागी करणे आवश्यक आहे. त्या किरीता शाळा, महाविद्यालयत हुंड्याच्या समस्ये बाबत चर्चा, निबंध स्पर्धा, परिसंवाद अयोजन केले पाहीजे. पथनाट्याद्वारे शाळा, महाविद्यालयतील विद्यार्थ्यांनी हुंड्याच्या प्रश्नाबाबत जागृती घडवून आणावी शाळा महाविद्यालयातील युवक-युवतीची हुंडा विरोधी प्रतिज्ञा घ्याव्यात आणि त्यानुसार आचरण करणे.

१) कायद्याची अमलबजावणी प्रभावीपणे करण्यात यावी.

२) सामाजीक कार्यकर्त्यांनी पुढकार घेवून वधुला जाळण्याच्या संदर्भात लोक चळवळ सुरु करावी.

३) वधुला जाळण्याच्या समस्ये बाबत जनजागृती केली पाहीजे. या समस्येच्या विरोधात लोकमत निर्माण करावे.

४) मुर्लीच्या सासरी छळ होत असल्यास पालकांनी त्वरीत त्या छळाची दखल घ्यावी.

५) महिलांना सरकारी कायद्याची माहिती देवून त्यांच्यात जागृती घडवून आणावी महिलांच्या खऱ्या शत्रु या महिलाच आहे याची त्यांना जाणीव करून द्यावी.

६) ज्या कुंटूंबातील लोकांनी वधुला जाळले असेल अशा कुटूंबावर बहीष्कार टाकावा ज्यामुळे इतर कुटूंबातील लोक आपल्या सुनांना जाळण्याची हिमत करणार नाहीत.

७) पतीने आपल्या पत्नीचा छळ न करता तिला सन्मानाने वागवावे, आई, वडील तसेच नातेवाईकांचे चुकत असेल तर वेळीच पतीने त्यांना समज द्यावी, त्यामुळे कौटुंबीक कलह वाढणार नाही असा पतीला सला देणारे मार्गदर्शन केंद्र सुरु करावेत.

वरील प्रकारच्या उपाययोजना केल्यास वधुना जाळण्याच्या समस्येला आळा घालता येईल.

याचबरोबर कौटुंबीक हिंसाचारा विरुध्द लोकमत निर्माण करणे महिला संघटनांनी चळवळ उभारणे महिलाचे मनोबल वाढविण्याचा प्रयत्न करावा, योग्य अमलबजावणी तसेच निःपक्षचौकशी व आरोपीस कठोर शिक्षा यासाठी सामाजिक दबाव निर्माण करण्याची गरज आहे.

**संदर्भ सूची :**


- भारत सरकारच्या गृहमंत्रायातंर्गत राष्ट्रीय गुन्हे नोंदणी कार्यालय अहावाल
- (UNICFF) The Progress of Nations १९९७ चा आंतरराष्ट्रीय अहवाल
- Y Alexander and S.M.Finger Terrorisim,Innterdisciplinarry Perspectice Joh Jay Pree, New Yark १९७७
- भारतीय समाज - प्रश्न आणि समस्या, डॉ. सुधा काळदाते.
- मशाल जयक्रांती महाविद्यालय वार्षिक अंक- २०१३-१४